"महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवट दारांना झाडांची विक्री करणे (विनियम) अधिनियम, १९६९ या अन्वये आदिवासी खातेदारांना प्रदाने" (२४०६ ०६८६).

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१९/प्र.क्र.३३७/फ-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १९ जुलै, २०१९.

वाचा :

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांचे पत्र क्र.-कक्ष-१/पी/यो/ चाबाप्र/प्र.क्र.३८/५०/२०१९-२०, दिनांक २०.०४.२०१९.
२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अंर्थसं-२०१७/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १.०४.२०१९.
३) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २२.०४.२०१९.
४) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अंर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८.०७.२०१९.

प्रस्तावना :

"महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवट दारांना झाडांची विक्री करणे (विनियम) अधिनियम, १९६९ या अन्वये आदिवासी खातेदारांना प्रदाने" (२४०६ ०६८६) सदरची योजना सन २०१७-१८ पासून योजनेत्तर मधून योजनांतर्गत वर्ग करण्यात आलेली आहे. सन २०१९-२० साठी सदर योजनांतर्गत एकूण रु. ४००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

सदर योजनेअंतर्गत अनुसुचित जमातीच्या भोगवट दारांना झाडांची विक्री करणे (विनियमन) अधिनियम, १९६९ या अन्वये आदिवासी खातेदारांना प्रदाने केली जातात. सदर प्रदाने अधिनियमानुसार वेळीच देणे अपेक्षित आहे. परंतू या संबंधाने वनवृत्तांकडून प्रस्ताव सादर करणे व तो शासनास सादर करुन मंजुरी प्राप्त करणे यास बराच कालापव्यय होतो. सदर कालापव्यय टाळण्यासाठी सदर योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेला नियतव्यय BDS द्वारे वितरीत करण्यात येण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या उपरोक्त दिनांक २०.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार, सन २०१९-२० मध्ये प्रथम ९ महिन्याकरिता (डिसेंबर अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्के मर्यादेत निधी वितरण करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान केले आहेत.

त्यानुषंगाने अनुसुचित जमातीच्या भोगवट दारांना झाडांची विक्री करणे (विनियमन) अधिनियम, १९६९ राज्य योजनेअंतर्गत एकूण रु. ४००.०० लक्ष अर्थसंकल्पीत निधीच्या मर्यादेत वित्त विभागाच्या दिनांक ८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकाच्या अधिन राहून अर्थसंकल्पीत निधीपैकी रु. २४०.०० लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध असून त्यापैकी रु. १३३.३३ लक्ष निधी यापूर्वी दिनांक २२.०४.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे. सबब सद्य:स्थितीत रु. १०६.६७ लक्ष इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे.

सदर रु १०६.६७ .लक्ष इतका निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:

सन २०१९-२० करिता "महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवट दारांना झाडांची विक्री करणे (विनियम) अधिनियम, १९६९ या अन्वये आदिवासी खातेदारांना प्रदाने" (२४०६ ०६८६) या योजनेअंतर्गत एकूण रु. ४००.०० लक्ष अर्थसंकल्पीत निधीपैकी वितरणासाठी उपलब्ध एकूण रु. १०६.६७ लक्ष (०२ मजूरी- रु. ५,८६,६८५/- व ५० इतर खर्च - रु. १,००,८०,३१५/-) निधी प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

१. ज्या प्रयोजनासाठी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे, त्याच प्रयोजनावर निधी खर्च करण्यात यावा.
२. यामध्ये कोणत्याही प्रकारची वित्तिय अनियमितता होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.
३. वित्त विभागाने दिनांक ११/७/२००१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वित्तिय मर्यादा यापुढेही लागू राहतील.
४. सदर मान्यता ही सन २०-२०१९ या कालावधी करिताच देण्यात येत आहे.

सदर खर्च हा मागणी क्रमांक - सी-७, २४०६ वनीकरण व वन्य जीवन ८०० इतर खर्च, (०१) इतर खर्च, (०१) (०५) "महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांना झाडांची विक्री करणे (विनियम) अधिनियम, १९६९ अन्वये आदिवासी खातेदारांना प्रदाने" (२४०६ ०६८६) या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१९-२० मध्ये मंजूर अर्थसंकल्पित अनुदानातून भागविण्यात यावा. निधी खर्च करताना वित्त विभागाने मासिक निधी विवरणपत्र तसेच इतर बाबतीत दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १.०४.२०१९ व दिनांक ८.०७.२०१९ रोजीचे परिपत्रक आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७/४/२०१५ भाग पहिला उप विभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१९१६०२०७९४१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Pandurang Pandhare

Digitally signed by Sunil Pandurang Pandhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7f874792415b92ba519384cacb41b53a89cf93dbd96d4be1f7d97fb6326eed47, cn=Sunil Pandurang Pandhare
Date: 2019.07.19 16:12:54 +05'30'

(सुनिल पांढरे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख कक्ष), नागपूर.

५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७) वित्त विभाग, व्यय १०/ अर्थसं-४ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८) कार्यासन अधिकारी (फ-२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) निवडनस्ती, कार्यासन (फ-३), म.व.व.वि., मंत्रालय, मुंबई-३२.